# महाराष्ट्र शासन
## शासकीय अध्यापक महाविद्यालय,
## नांदेड
## स्वातंत्र्य सैनिक सोसायटी, शोभानगर जवळ नांदेड - 431605

Principal : Dr.Sunanda G Rodge　Web : www.gcenanded.in　Email :- gcenanded@gmail.com

कार्यालय - (02462) 224523　फॅक्स - (02462) 222220　प्राचार्य निवास (02462) 256006


जा.क्र.शाअमविनां/आस्था/स्थासस/2016-17/2135-42　दिनांक : 24/08/2016

प्रति,

1) डॉ.एम.एन.खताळ, शिक्षण सहसंचालक (उ.शि.) नांदेड
2) डॉ.सुनंदा गो रोडगे, प्राचार्य शा.अ.महा.नांदेड
3) डॉ.एस.बी.थोरात, प्राचार्य आयटीएम कॉलेज नांदेड
4) डॉ.अनिल पाटील, चैतन्य नगर नांदेड
5) श्री.पुरुषोत्तम रामहरी गाठे
6) डॉ.एच.एम.शेख,सहयोगी प्राध्यापक प्रस्तुत महाविद्यालय
7) श्री.बी.एच.गच्चे,मुख्यलिपिक प्रस्तुत महाविद्यालय

विषय : स्थानिक सल्लागार समितीच्या सहविचार सभेबाबत.

संदर्भ : शासन निर्णय क्रमांक :5813/प्र.क्र.187/13/मशि-2 दिनांक 06/12/2013

महोदय,

वरील संदर्भीय विषयी सन 2016-17 या शैक्षणिक वर्षाची प्रारंभीची स्थानिक सल्लागार समितीची सहविचार सभा दि.29/08/2016 रोजी दुपारी 03.00 वाजता शासकीय अध्यापक महाविद्यालय नांदेड येथे प्राचार्य कक्षात आयोजित करण्यात आली आहे. सदरील सभेकरीता आपणास आमंत्रीत करण्यात येत आहे. सोबत विषयपत्रिका जोडली आहे. कृपया सभेमध्ये महाविद्यालयाच्या शैक्षणिक व विकासात्मक गुणवतेसाठी मार्गदर्शन करावे ही विनंती.

सोबत : विषय पत्रीका

(डॉ.सुनंदा गो रोडगे)
प्राचार्य तथा सदस्य सचिव
शासकीय अध्यापक महाविद्यालय
नांदेड

प्रत : मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य पुणे- 01

**महाराष्ट्र शासन**
**शासकीय अध्यापक महाविद्यालय,**
**स्वातंत्र्य सैनिक सोसायटी, शोभानगर जवळ नांदेड - ४३१६०५**
**Principal : Dr.Sunanda G Rodge** Web : www.gcenanded.in Email :- gcenanded@gmail.com
कार्यालय - (02462) 224523 फॅक्स - (02462) 222220 प्राचार्य निवास (02462) 256006

जा.क्र.शाअमविनां/प्राचार्य कक्ष/2016-17/स्था.स.स/ दिनांक :- /08/2016

# स्थानिक सल्लागार समिती

दिनांक :- 29/08/2016
वेळ :- 3.00 वाजता.

## विषयपत्रिका

१. मागील सभेच्या अनुपालन अहवालास मान्यता देणे बाबत.

२. NCTE नियमाप्रमाणे शै.वर्ष 2016-17 यावर्षी बी.एड व एम.एड करिता विद्यार्थी प्रवेश संख्येबाबत चर्चा करणे.

३. महाविद्यालयाकरिता जागा मिळविण्याकरिता आतापर्यंत झालेल्या प्रयत्नांचा आढावा घेऊन पुढील कार्यवाहीबाबत चर्चा करणे.

४. महाविद्यालयातून जून 2016 मध्ये बदली होऊन गेलेल्य प्राध्यापकांच्या जागी नविन आलेल्या व सद्य: कार्यरत प्राध्यापकातून निरनिराळया समित्यावर सदस्य म्हणून निश्चिती करणे व त्यास मान्यता देणे.

५. महाविद्यालयाकरिता य.च.म.मु. अभ्यासक्रमातून मिळणारी विकास निधी व एम.एड स्वयंसहाय्यित निधी मधून महाविद्यालयाकरिता आवश्यक भौतिक साधन सुविधा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने चर्चा करुन मान्यता घेणे.

६. एम.एड करिता अध्यापक नेमण्याबाबत चर्चा करणे. (घडयाळी तासिका तत्वावर)

७. महाविद्यालयाच्या जागेचा पत्रव्यवहार व जागेच्या पुढील कार्यवाहीसाठी शासनस्तरावर प्रयत्न करणे. पत्रव्यवहाराचे अवलोकन करणे.

८. ऐनवेळचे विषय.

४)

(डॉ.सुनंदा गो. रोडगे)
**प्राचार्य तथा सदस्य सचिव**
**शासकीय अध्यापक महाविद्यालय**
**स्थानिक सल्लागार समिती**
**नांदेड**

**महाराष्ट्र शासन**
**शासकीय अध्यापक महाविद्यालय,**
**नांदेड**
**स्वातंत्र्य सैनिक सोसायटी, शोभानगर जवळ नांदेड - 431605**
Web : www.gcenanded.in Email :- gcenanded@gmail.com
कार्यालय - (02462) 224523 फॅक्स - (02462) 222220 प्राचार्य निवास (02462) 256006

जा.क्र.शाअमविनां/स्थासअ/2016-17/2203-09 दिनांक :06/09 /2016

प्रति,

१) डॉ.एम.एन.खताळ, शि.सहसंचालक उ.शि.नांदेड
२) डॉ.सुनंदा गो रोडगे, प्राचार्य शा.अ.महा.नांदेड
३) डॉ.एस.बी.थोरात, प्राचार्य आयटीएम कॉलेज नांदेड
४) डॉ.अनिल पाटील, चैतन्य नगर नांदेड
५) श्री.पुरुषोत्तम रामहरी गाठे,
६) डॉ.एच.एम.शेख, सहयोगी प्राध्यापक प्रस्तुत महाविद्यालय
७) श्री.बी.एच.गच्चे, मुख्यलिपिक प्रस्तुत महाविद्यालय

विषय :-स्थानिक सल्लागार समितीच्या सहविचार सभेचा अहवाल पाठविणे बाबत.

महोदय,

वरील विषयी कळविण्यात येते की, शासकीय अध्यापक महाविद्यालय नांदेड येथे दिनांक 29/08/2016 रोजी स्थानिक सल्लागार समितीची सहविचार सभा संपन्न झाली आहे. सदर सभेचा अहवाल या सोबत जोडण्यात येत आहे.

तरी सहविचार सभेच्या अहवालाचा स्विकार व्हावा ही विनंती.

सोबत : अहवालाची प्रत.

Govt B.Ed College Nanded (Local Committee)

(डॉ.सुनंदा गो.रोडगे)
**प्राचार्य तथा सदस्य सचिव**
**शासकीय अध्यापक महाविद्यालय**
**नांदेड**

दिनांक 30/08/2016

# स्थानिक सल्लागार समितीच्या सभेचा अनुपालन अहवाल

दि. 29-08-2016 रोजी मा. अध्यक्षांच्या उपस्थितीत स्थानिक सल्लागार समितीची बैठक मा. प्राचार्य यांच्या दालनामध्ये दुपारी ठिक 04.00 वाजता संपन्न झाली. सभेस खालील सन्माननिय सदस्य उपस्थित होते. सभेत खालील विषयावर साधक/बाधक चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले आहेत.

1. **मा.डॉ. एम.एन. खताळ,**(शिक्षण सहसंचालक,उ.शि. नांदेड विभाग):-**अध्यक्ष**
2. **मा. प्राचार्य डॉ. सुनंदा गो. रोडगे** :-**सदस्य सचिव**
3. **मा.प्राचार्य डॉ.एस.बी.थोरात** :-**अशासकीय सदस्य**
4. **मा.प्रा.डॉ.एच.एम.शेख** :-**शिक्षक प्रतिनिधी**
5. **श्री. बी.एच.गच्चे** (मुख्यलिपिक) :-**शिक्षकेत्तर प्रतिनिधी**

**विषय क्र.01. :- मागील सभेच्या अनुपालन अहवालास मान्यता देणे.**

मा. सदस्य सचिव यांनी दिनांक 28/09/2015 रोजीच्या बैठकीच्या अनुपालन अहवालाची नोंद घेऊन, सर्वानुमते अनुपालन अहवालास मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.02.:- NCTE नियमाप्रमाणे शै.वर्ष 2016-17 या वर्षी बी.एड व एम.एड करीता विद्यार्थी प्रवेश संख्येबाबतच्या अडचणींवर चर्चा करण्यात आली.**

अ) प्रवेशीत विद्यार्थी संख्या बैठकीत ठेवण्यात आली. 1) बी.एड. प्रथम वर्ष प्रवेश -08 द्वितिय वर्ष -39
2) एम.एड.प्रथम वर्ष प्रवेश -निरंक द्वितिय वर्ष -11

ब) बी.एड व एम.एड. अभ्यासक्रमासाठीच्या प्रवेशास प्रशिक्षणार्थ्यांचा अल्पप्रतिसाद असल्यानेमुळे सभेत चिंता व्यक्त करण्यात आली, प्रवेश समितीमार्फत येणा-या या वर्षी प्रशिक्षणार्थ्यांस नियमानुसार प्रवेश देण्यात यावा असे सभेत ठरले.

**विषय क्र.03 : महाविद्यालयाकरीता जागा मिळण्याकरीता झालेल्या प्रयत्नांचा आढावा घेऊन पुढील कार्यवाहीबाबत चर्चा करणे**

महाविद्यालयाच्या इमारती संदर्भात व महाविद्यालयाच्या स्वत:च्या मालकीच्या जागेविषयी चर्चा करण्यात आली. मा.शिक्षण संचालक,उ.शि.म.रा.पुणे यांचे दि.22/06/2016 च्या पत्रानुसार, शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय नांदेडच्या परिसरातील रिकामी जागा किंवा जुनी इमारत मिळण्याकरीता मा.शिक्षण सहसंचालक (उ.शि.) नांदेड यांनी मा.शिक्षण संचालक (उ.शि.) म.रा.पुणे यांना अहवाल सादर करण्याचे ठरविण्यात आले. मा.शिक्षण सहसंचालक उ.शि.नांदेड यांना प्राचार्य सर्वतोपरी सहकार्य करतील असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.04: महाविद्यालयातुन जून 2016 मध्ये बदली होऊन गेलेल्या प्राध्यापकांच्या जागी नविन व सद्य:कार्यरत प्राध्यापकातून निरनिराळयार समित्यावर सदस्य म्हणून नियुक्ती करणे, त्यास मान्यता देणे.**

महाविद्यालयामध्ये खालील स्वरुपाच्या समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत व समित्यावर महाविद्यालयातील कार्यरत व नव्याने नियुक्त झालेल्या प्राध्यापकांच्या नियुक्तीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली आहे.

**महाविद्यालयातील विविध समित्या :**

1) महिला तक्रार निवारण समिती.
2) प्रशिक्षणार्थी गणवेश समिती
3) प्रशिक्षणार्थी तक्रार निवारण समिती
4) माहिती अधिकारी समिती.
5) रॅगिंग समिती
6) प्रशिक्षणार्थी मार्गदर्शन व समुपदेशन समिती
7) बी.एड व एम.एड साहित्य छपाई समिती
8) महाविद्यालयीन साहित्य खरेदी समिती
9) ग्रंथालय विकास समिती
10) माहिती पुस्तिका व ओळख पत्र छपाई समिती.
11) स्थानिक प्रवेश समिती
12) अंतर्गत गुणवत्ता विकास समिती.

**विषय क्र.05: महाविद्यालयाकरीता य.च.म.मु.विद्यापीठ अभ्यासक्रमातून मिळणारा विकास निधी व एम.एड स्वयंसहाय्यित निधी मधून महाविद्यालयाकरीता आवश्यक भौतिक साधन सुविधा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने चर्चा करुन मान्यता घेणे.**

आवश्यकतेनुसार महाविद्यालयाकरीता भौतिक साधन सुविधा य.च.म.मु.विद्यापीठ अभ्यासक्रमातून मिळणा-या विकास निधी मधून व एम.एड स्वयंसहाय्यित निधीतून शासनाच्या प्रचलित नियमाप्रमाणे खर्च करण्यात यावा असे सर्वानुमते मान्य करण्यात आले.

**विषय क्र.06 : एम.एड करीता अध्यापक नेमण्याबाबत चार्चा करणे (घडयाळी तासिका तत्वावर)**

एम.एड अभ्यासक्रमास पुरेसा प्रशिक्षणार्थी वर्ग प्रवेशीत झाल्यानंतर, लागणारे अध्यापक अगदी तात्पुरत्या स्वरुपात वर्तमानपत्रातून जाहिरात देऊन मुलाखतीद्वारे घडयाळी तासिका तत्वावर नेमण्याचे सर्वानुमते मान्य करण्यात आले.

**ऐनवेळीचे विषय -**

**विषय क्र.01 : PLA स्वियप्रपंजी खाते बंद करुन, स्वतंत्र खाते उघडणे व डी.डी.ओ.खात्यावर जमा असलेली रक्कम तुर्त PLA खात्यात जमा करणे बाबत.**

मागास प्रशिक्षणार्थ्यांची शिष्यवृत्ती रक्कम विभागाकडून परस्पर प्रशिक्षणार्थ्यांच्या बँक खात्यावर वर्ग होत आहे. जर प्रशिक्षणार्थ्यांनी परीक्षा शुल्क शिष्यवृत्ती फॉर्म मध्ये दर्शविली नसेल तर, सदर शुल्क,शैक्षणिक शुल्क,महाविद्यालयीन शुल्क जमा होण्याच्या दृष्टीने विभागाने महाविद्यालयास स्वतंत्र बँक खाते उघडण्यास सांगितले होते. परंतु महाविद्यालयाकडून स्वतंत्र बँक खाते उघडले नसल्यामुळे, विभागानी सदरहू रक्कम मागील कांही वर्षापासून प्राचार्य यांच्या डी.डी.ओ.खात्यावर जमा केली आहे. सदरहू रक्कमेची परिगणणा करुन, तुर्त PLA खात्यात जमा करावी. प्रशिक्षणार्थ्यांस देय ठरणारी रक्कम प्रशिक्षणार्थ्यांस अदा करुन, महाविद्यालयाची शुल्क महाविद्यालयाच्या विकासासाठी लेखा शिर्षाप्रमाणे वापरुन, उर्वरित रक्कम शासन खाती जमा करण्यात

यावी व PLA खाते बंद करण्याचे तसेच सदर प्रकारची रक्कम जमा होणेकरीता बँकेत डी.डी.ओ. खात्याशिवाय दुसरे नविन खाते उघडयाबाबत सर्वानुमते मान्य करण्यात आले.

**विषय क्र.02 : महाविद्यालयास शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध होणे करीता नविन आरओ (मशिन) व चार वॉल फॅन खरेदी करणे.**

महाविद्यालयामध्ये कार्यरत असलेले आर.ओ.मशिन टाईमबार झाली आहे. महाविद्यालयीन कर्मचारी,प्रशिक्षणार्थी यांना शुध्द पाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने य.च.म.मु.विद्यापीठ अभ्यासक्रमातून मिळणा-या विकास निधी मधून शासनाच्या प्रचलित नियमानुसार नविन आर.ओ.मशिन व महाविद्यालयीन प्रशिक्षणार्थ्यासाठी 4 वॉल फॅन खरेदी करण्यास समितीने मंजूरी दिली आहे.

विषय क्र.03 : ई.बी.सी.मंजूरी संदर्भात.

शै.वर्ष 2015-16 साठी मा.शिक्षण सहसंचालक उ.शि.कार्यालयाकडून मंजूर झालेली 04,000/- रुपये ई.बी.सी. देय प्रशिक्षणार्थ्यास वाटप करण्यास समितीने मंजूरी दिली आहे.

**विषय क्र.04 : प्रा.डॉ.व्ही.आर.गंदगे, सहयोगी प्राध्यापक यांचे अंतिम वेतन प्रमाणपत्र पाठविणे बाबत.**

संबंधितानी त्यांच्याकडील य.च.म.मु.विद्यापीठ अभ्यासक्रमाचा आर्थिक हिशोब अदयाप सादर न केल्यामुळे, सबंधिताचे अंतिम वेतन प्रमाणपत्र पाठविण्यात आलेले नाही. सदरहू हिशोब सबंधिताकडून पूर्ण झाल्यानंतर य.च.म.मु.विद्यापीठाचा कार्यभार हस्तांतरण केल्यानंतर अंतिम वेतन प्रमाणपत्र देण्यात यावे असे चर्चे अंती ठरले.

**विषय क्र.05 : महाविद्यालयातील रिक्त पदे तासिका तत्वावर भरणे.**

महाविद्यालयामध्ये ग्रंथपाल,शारीरिक शिक्षण व कला शिक्षकांची पदे रिक्त आहेत. सदरहू पदे प्रशिक्षणार्थ्यांचे हित लक्षात घेता वर्तमानपत्रात जाहीरात देऊन सदरहू पदे अगदी तात्पुरत्या स्वरुपात घडयाळी तासिकेवर घेण्याबाबत व शारीरिक शिक्षण व कला शिक्षकांचे घडयाळी तासिकेवरील मानधन स्वयंसहाय्यित निधीतून व ग्रंथपाल पदाचे मानधन शासनाच्या मान्य आर्थिक तरतुदीतून अदा करण्याचे समितीने मान्य केले आहे.

अशा प्रकारे विषयपत्रिकेतील सर्व विषयावर सखोल चर्चा होऊन सर्वानुमते निर्णय घेऊन, स्थानिक सल्लागार समितीचे प्रभारी डॉ.एच.एम.शेख , सहयोगी प्राध्यापक यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त करुन मा.अध्यक्षाच्या वतीने सभा समाप्त झाल्याचे घोषित केले.

(सही)

**(डॉ.सुनंदा गो.रोडगे)**
**प्राचार्य**
**शासकीय अध्यापक महाविद्यालय**
**नांदेड**

**<u>प्रत माहितीस्तव.</u>**

1) मा.शिक्षण संचालक,उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य पुणे-01
2) मा.शिक्षण सहसंचालक,उच्च शिक्षण नांदेड विभाग, नांदेड
3) स्थानिक सल्लागार समितीतील सनमाननिय सर्व सदस्य.